# राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण, शेती व उद्योगधंदे या क्षेत्रातील कार्य.

**प्रा.कस्तुरे योगेश प्रकाश,** सहायक प्रा.राज्यशास्त्र विभाग, सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज,कराड. मो.९७६६७५९३७६.

---

**प्रस्तावना:**

सर्व समाजसुधारकांनी सामाजिक सुधारणांचा पाया हा शिक्षण मानला आहे. शिक्षणापासून बहुजन समाज वंचित राहिल्यामुळेच त्यांच्यावर अज्ञान व दारिद्र्य येते. शिक्षणाविना अनेक अनर्थ होतात. या अविद्येचे कारण होते जातिभेद. वरिष्ठ वर्गाने कनिष्ठ जातींवर लादलेली विद्याबंदी हेच देशाच्या अधोगतीच कारण आहे असे राजर्षी शाहू महाराज प्रतिपादन करतात. कोल्हापूर संस्थानामध्ये अस्पृश्यांना शिक्षणाची सोय करण्यापासून ते सक्तीचे प्राथमिक शिक्षण करण्यापर्यंत राजर्षी शाहू महाराज यांनी अनेक शैक्षणिक सुधारणा केल्या. ज्याद्वारे कोल्हापूर संस्थानामध्ये शैक्षणिक क्रांती घडून आली. कोल्हापूर संस्थानामधील जनतेचा प्रमुख व्यवसाय शेती. या शेती क्षेत्रासाठी राजर्षी शाहू महाराजांनी आधुनिकतेचे जोड दिली. तसेच आपल्या संस्थानामध्ये उद्योगधंद्यांची पायाभरणी करून रोजगाराच्या संधी आपल्या संस्थानामध्ये निर्माण केल्या. राज्यरोहनानंतर त्यांनी कोल्हापूर संस्थानात जे शिक्षण,शेती व उद्योगधंदे या क्षेत्रात कार्य केले. त्याचा परिणाम संस्थानामधील सर्व क्षेत्राची प्रगती होऊन पुरोगामी कोल्हापूरच्या निर्मितीची पायाभरणी झाली.कोल्हापूर संस्थानाच्या प्रगतीचे जनक राजर्षी शाहू महाराज यांच्या शैक्षणिक,शेती व उद्योगधंदे कार्याचा अभ्यास होणे क्रमप्राप्त आहे. म्हणून त्यांच्या कार्याचा आढावा घेण्याचा हा थोडक्यात प्रयत्न आहे.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये:**

1. राजर्षी शाहू महाराज यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेणे.
2. राजर्षी शाहू महाराज यांच्या कृषीविषयक कार्याचा अभ्यास करणे.
3. राजर्षी शाहू महाराज यांचे उद्योग क्षेत्रातील योगदानाचा अभ्यास करणे.

**अभ्यासाची गृहितके:**

1. कोल्हापूर संस्थानामध्ये पूर्वी अस्पृश्य शिक्षणापासून वंचित होते.
2. राजर्षी शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केल्याने शालेय विद्यार्थी संख्येत वाढ झाली.
3. राजर्षी शाहू महाराजांनी शेतीविषयक केलेल्या उपाययोजनांमुळे शेतकऱ्यांच्या समस्या कमी होऊन उत्पन्नात वाढ झाली.
4. संस्थानांमध्ये उद्योगधंद्याची सुरुवात झाल्यामुळे रोजगार निर्मिती झाली.

**संशोधन पद्धती:**

संबंधित संशोधन कार्यात तथ्य संकलन करण्यासाठी दुय्यम स्त्रोत तसेच ऐतिहासिक व वर्णनात्मक पद्धतीचा आधार घेण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनाला उपयुक्त ठरेल असे विविध संदर्भ ग्रंथ आणि इंटरनेटचा आधार घेऊन संशोधन मांडणी केली आहे.

**शोधनिबंधाचे स्पष्टीकरण:**

**राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षण विषयक कार्य:**

राजर्षी शाहू महाराज यांच्या मते शिक्षण हा एकमेव सर्व सामाजिक सुधारणा व प्रगतीचा राजमार्ग आहे. समाजामधील मागासलेल्या लोकांची गुलामगिरी नष्ट करण्यासाठी त्यांना किमान प्राथमिक शिक्षण दिले पाहिजे याचा त्यांनी पुरस्कार केला. ते असे म्हणतात "खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर हे जे जड व जुलमी जू लादले गेले आहे ते झुगारून देण्याची शक्ती बहुजनांच्या अंगी येण्यासाठी सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण अत्यंत गरजेचे आहे".

शिक्षण समाजामधील सर्व वर्गातील लोकांपर्यंत पोहोचत नाही तोपर्यंत समाजाची प्रगती होऊ शकत नाही हे त्यांनी ओळखले होते. यासाठी मागासलेल्या घटकांची प्रगती शिक्षणाच्या मार्गाने त्यांनी करावयाचे ठरवले होते. त्यांनी अस्पृश्यांचे वस्तीगृह सुरू केले. अस्पृश्य समाजामध्ये असणारी शिक्षणाची अनास्था दूर करून त्यांच्यामध्ये शिक्षणाची जागृती घडवून आणून सन १८९४ ला राज्यरोहनच्या प्रसंगी संस्थानात अस्पृश्यांसाठी असणाऱ्या शाळांची संख्या ५ व विद्यार्थी संख्या १६८ होती. सन १९१२ ला शाळांची संख्या २७ व विद्यार्थी संख्या ६३६ इतकी वाढ झाली. त्याकाळी चौथी पास झालेल्या अस्पृश्य मुलास इयत्ता पाचवी मध्ये प्रवेश मिळत नसे. कारण पाचवीमध्ये प्रवेश घेण्यासाठी आवश्यक असणारी पात्रता त्यांच्यामध्ये निर्माण होत नसे. याचे कारण स्पृश्य आणि अस्पृश्य शाळांचा अभ्यासक्रम हा वेगळा होता. अस्पृश्यांच्या अभ्यासक्रमाचा दर्जा खूपच खालच्या दर्जाचा असल्याने त्यांच्यामध्ये विशेष गुणवत्ता निर्माण होत नसे. अस्पृश्य मुलांनीही इयत्ता पाचवी मध्ये प्रवेश घेतला पाहिजे. या हेतूने राजर्षी शाहू महाराजांनी या अस्पृश्य वर्गातील मुलांसाठी खास पात्रता वर्गाची सोय केली. जेणेकरून अस्पृश्य मुलांना इयत्ता पाचवीमध्ये प्रवेश मिळणे सोपे जाईल. त्यांनी २४ नोव्हेंबर १९११ रोजी एक आदेश काढला.त्या आदेशानुसार

NAVJYOT /Vol. XI / Issue – II ISSN 2277-8063

संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले. अस्पृश्य वर्गातील मुलांसाठी शिष्यवृत्ती सुरू करण्यात आल्या. यावरून शाहू महाराजांनी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी केलेले कार्य किती विशाल आहे याची कल्पना येते.

**मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा:**

राजर्षी शाहू महाराजांनी २१ सप्टेंबर १९१७ रोजी एक जाहीरनामा प्रसिद्ध करून सक्तीचा शिक्षणाचा कायदा केला. या कायद्याचा उद्देश करवीर इलाख्यातील आमच्या सर्व प्रजाजनांना लिहिता-वाचता येऊन आपली स्थिती ओळखून सुधारण्यास समर्थ व्हावे म्हणून सदर कायदा केल्याचे स्पष्ट केले. या कायद्याने मुलांना शाळेत पाठवण्याची सक्ती आई-वडिलांवर करण्यात आली. सदर कायद्याची अंमलबजावणी न केल्यास प्रत्येकी एक रुपये दंड दर महिना करण्याची तरतूद करण्यात आली. दिनांक ४ मार्च १९१८ ला सक्तीच्या शाळेचा उद्घाटन समारंभ राजर्षी शाहू महाराजांच्या हस्ते झाला. सदर कायद्यानुसार पाचशे ते एक हजार लोकसंख्या असणारे गावात प्राथमिक शाळा मिळेल त्या जागी स्थापन करण्यात आल्या. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी त्यांनी संस्थानामध्ये दरवर्षी एक लाख रुपयांची तरतूद केली. तत्कालीन परिस्थिती पाहता इतर मोठ्या संस्थानांमध्ये ही शिक्षणासाठी एवढ्या खर्चाची तरतूद नव्हती.अशा परिस्थितीमध्ये सुद्धा शिक्षणाशिवाय सामाजिक सुधारणा अशक्य आहेत हे ओळखून त्यांनी आपल्या संस्थानामध्ये शिक्षणासाठी भरीव आर्थिक तरतूद केली होती.

या शिक्षणाच्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी १९१८ साली शिक्षणासाठी एक स्वतंत्र खात्याची स्थापना केली. सदर खात्याच्या प्रभावी कार्यासाठी डायरेक्टर व एज्युकेशनल इन्स्पेक्टर यांची नेमणूक केली. आपल्या संस्थानामधील मामलेदार पासून ते अगदी पोलीस पाटलापर्यंत कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विशिष्ट अशी जबाबदारी प्रत्येकावर निश्चित करण्यात आली होती. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या योजनेची यशस्विता अल्पावधीतच सिद्ध झाली. सन १९१७-१८ ला या योजनेखाली २७ शाळा व १२९६ मुले होती तर हीच संख्या १९२१-२२ मध्ये शाळांची संख्या ४२० व मुलांची संख्या २२००७ झाली. या आकडेवारी मधूनच राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणाच्या कायद्याची किती कठोर अंमलबजावणी केली असेल याची प्रचिती येते.

राजर्षी शाहू महाराज यांच्या शैक्षणिक धोरणाची यशस्विता काही वर्षातच स्पष्टपणे दिसू लागली. राज्यरोहणापासून ते १९२२ पर्यंत कोल्हापूर संस्थानांमध्ये मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक विस्तार झाला. १८९४ ला असणारी विद्यार्थी संख्या १०८४४ होती. ती १९२२ साली २७८३० इतकी प्रचंड वाढली. अस्पृश्यांसाठी केलेल्या शैक्षणिक तरतुदींचा सकारात्मक परिणाम या कालखंडामध्ये झाला. अस्पृश्य विद्यार्थ्यांची संख्या २३४ वरून २१६२ इतकी वाढली. कॉलेज विद्यार्थ्यांची संख्या ७९ वरून २६५ इतकी झाली. १८९४ ला ७९ विद्यार्थ्यांमध्ये ६ विद्यार्थी ब्राह्मणेतर होते. हेच प्रमाण १९२२ साली २६५ विद्यार्थ्यांमध्ये ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांची संख्या १०० झाली. समाजामधील सर्व घटकांना सामावून घेणारी शैक्षणिक व्यवस्थेची सुरुवात राजर्षी शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानात केली.

**स्त्री शिक्षणामधील योगदान:** राजर्षी शाहू महाराजांनी संस्थांनामधील स्त्रियांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न केले. संस्थांनामधील मुलींनी शाळेत यावे तसेच मुलांच्या बरोबरीने शिक्षण घ्यावे. यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. मुलांच्या शाळेत पास होणाऱ्या मुलींच्या संख्येवर शिक्षकांना खास प्रोत्साहन म्हणून बक्षीस दिले जात असत. जेणेकरून शिक्षकांनी आपले कार्य अजून जबाबदारीने पार पाडावे. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे म्हणून त्यांनी काही खास शिष्यवृत्ती ठेवल्या होत्या. तसेच राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या सर्व मुलींना त्यांनी शिक्षण मोफत केले. स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास शिक्षणाशिवाय होणार नाही असे राजर्षी शाहू महाराजांचे मत होते. स्त्री शिक्षणाविषयी त्यांची असलेली तळमळ आपल्याला पुढील घटनेवरून सिद्ध होते. राजघराण्याचा विरोध असतानासुद्धा त्यांनी आपल्या विधवा सुनेला शिक्षण देण्याचा धाडसी निर्णय घेतला.

**शेती क्षेत्रातील योगदान:** कोल्हापूर जिल्हा हा महाराष्ट्रातील कृषी संपन्न जिल्हा म्हणून ओळखला जातो. याचे संपूर्ण श्रेय राजर्षी शाहू महाराज यांना जाते. कारण त्यांनी त्या क्षेत्राची पायाभरणी केली.राज्यरोहणाच्या नंतर नजीकच्या कालखंडातच संस्थानाला दुष्काळासारख्या समस्येला तोंड द्यावे लागले. या समस्येवर कायमस्वरूपी मात करण्याचे शाहू महाराजांनी ठरविले. त्यासाठी त्यांनी १९०२ ला सार्वत्रिक पाठबंधारे धोरण जाहीर केले. याकामी स्वतंत्र पाटबंधारे खात्याची स्थापना करून इरिगेशन ऑफिसरची नेमणूक केली.

**राधानगरी धरण प्रकल्प:** राजर्षी शाहू महाराजांनी १९०२ च्या युरोपच्या दौऱ्यातून प्रेरणा घेऊन सह्याद्रीच्या माथ्यावर पडणारे पाणी अडवून धरण बांधण्याचा प्रकल्प हाती घेतला. लोककल्याणाची मनामध्ये असणारी तळमळ यामुळेच त्यावेळच्या भारतामधील सर्वात मोठा धरण प्रकल्प त्यांनी हाती घेतला होता. १९०९ ला धरणाचे प्रत्यक्ष बांधकाम सुरू झाले. पुढे १९१८ पर्यंत १४ लाख रुपये खर्च करून धरणाचे ४० फुटापर्यंत काम पूर्ण झाले. यामधून सहाशे दशलक्ष घनफूट पाणी उपलब्ध झाले. शेतीसाठी पाणी उपलब्ध झाल्याने भोगावती भोगावती नदीच्या दोन्ही तीरावर हिरवीगार शेती बहरू लागली. शेतीचा उत्पन्नामध्ये वाढ करून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या संपन्न करावयाचे असल्यास शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

केल्याशिवाय पर्याय नाही हे राजर्षी शाहू महाराजांनी ओळखले होते. यासाठी संस्थानात सुधारित शेती पद्धतीचा प्रसार करण्यासाठी १९२२ साली त्यांनी कोल्हापुरात 'किंग एडवर्ड एग्रीकल्चर इन्स्टिट्यूट' ही संस्था स्थापन केली. संस्थानामधील शेतकऱ्यांना सुधारित बी-बियाणे, आधुनिक अवजारे, रासायनिक खते, आधुनिक मशागत पद्धतीचे ज्ञान व प्रसार होण्यासाठी शेती अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या. शेतकऱ्यांनी आपली शेती आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने करावी यासाठी खास कृषी प्रदर्शने भरली जाऊ लागली. संस्थानामध्ये पारंपारिक ऊस, भात, ज्वारी, भुईमूग ही पिके घेतली जात असत. कृषी क्षेत्रामध्ये नवनवीन प्रयोग आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून करण्याचा मानस त्यांचा होता. चहा, कॉफी, रबर यासारखी कधीच उत्पन्न न घेतलेली पिके संस्थानांमध्ये त्यांनी घेतली. चहाच्या मळ्याचा प्रयोग यशस्वी होऊन कोल्हापूरचा चहा 'Panaha Tea No-4' या नावाने प्रसिद्धीस आला. तसेच शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा म्हणून त्यांनी विविध बाजारपेठा सुरू केल्या.

**उद्योगधंद्याच्या क्षेत्रातील योगदान:** संस्थानामध्ये राजर्षी शाहू महाराज यांनी उद्योगधंद्याच्या निर्मितीसाठी व वाढीसाठी अविरतपणे प्रयत्नशील होते. नवीन उद्योगधंद्याच्या पायाभरणीसाठी महाराजांनी औद्योगिक सर्वेक्षणही करून घेतले होते. त्यांनी अनेक उद्योग सुरू केले. १९०५ सालापर्यंत कोल्हापुरात सुगंधित औषधी तेल उद्योग, मधुमक्षिकापालन उद्योग, सुती कापड उद्योग असे अनेक उद्योग त्यांनी संस्थानामध्ये सुरू केले. सदर उद्योगाच्या प्रशिक्षणासाठी देशाच्या वेगवेगळया भागात आपली माणसे पाठविली. १९०४ साली त्यांनी डी. एस.शाळीग्राम यांची इंडस्ट्रियल इन्स्पेक्टर म्हणून नेमणूक केली. जंगल संपत्तीवर आधारित काही नवीन उद्योग त्यांनी सुरू केले. यामध्ये प्रामुख्याने सुगंधी औषधी तेल उद्योगाचा समावेश होता. मधुमक्षिकापालन उद्योग हा त्यांचा अभिनव प्रयोग. सदर उद्योगासाठी कोठूनही तांत्रिक ज्ञान उपलब्ध नसताना त्यांनी आपल्या संस्थानामध्ये मधुमक्षिकापालन उद्योग सुरू केला.

**शाहू छत्रपती मिल्सची स्थापना:** राजर्षी शाहू महाराजांच्या प्रेरणेने कोल्हापूर संस्थानामध्ये सर्वात मोठा प्रकल्प सुरू झाला तो म्हणजे कापड गिरणीचा. १९०६ ला शाहू छत्रपती स्पिनिंग अँड विव्हींग मिल्स या गिरणीची स्थापना झाली. या गिरणीचा उभारणीसाठी आवश्यक असणारी जागा तसेच ५० हजार रुपये भांडवल महाराजांनी उपलब्ध करून दिले. पुढे १९०६ ला दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर गिरणीची सुरुवात झाली. त्यामुळे संस्थानामध्ये अनेकांना रोजगार मिळाला. उद्योगासाठी प्रशिक्षित कामगारांची असणारी गरज ओळखून त्यांनी राजाराम इंडस्ट्रियल स्कूल स्थापन केले. संस्थानातील उद्योगासाठी अल्प मुदतीची कर्जे सरकारकडून उपलब्ध करून दिली. एकंदरीतच उद्योगधंद्याच्या निर्मितीसाठी व विस्तारासाठी राजर्षी शाहू महाराज यांनी अथक प्रयत्न केलेले दिसून येतात.

**समारोप:**

अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कारकिर्दीमध्ये अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी उल्लेखनीय कार्य केले. तसेच त्यांच्यासाठी विविध शिष्यवृत्ती सुरू केल्या. या सर्वांचा परिणाम म्हणजे अस्पृश्य मुलांचे शिक्षण घेण्याचे शिक्षणाचे प्रमाण वाढले. महिला शिक्षण व उच्च शिक्षणासाठी ही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. त्यांनी संस्थानांमध्ये सक्तीचा शिक्षणाचा कायदा करून एका नवीन शैक्षणिक पर्वाला सुरुवात केली. संस्थानामध्ये पिढ्यानपिढ्या होत असलेल्या पारंपरिक शेतीऐवजी शेतीमध्ये आधुनिकता व प्रयोगशीलता यांची योग्य जोड देऊन शेतकऱ्याच्या उत्पन्नामध्ये वाढ घडवून आणली. संस्थानामध्ये औद्योगिक सर्वेक्षण करून त्यांनी उद्योगधंद्याची पायाभरणी केली. अशा प्रकारे शिक्षण, शेती व उद्योगधंदे या तिन्ही क्षेत्रात क्रांतीचे बीजरोपण करण्याचे कार्य राजर्षी शाहू महाराज यांनी केले.

**निष्कर्ष:**

1.राजर्षी शाहू महाराज यांच्या विस्तीर्ण व सर्वव्यापी शैक्षणिक धोरणामुळे कोल्हापूर संस्थानात शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली.

2.युरोपातील तंत्रज्ञानाचा व प्रयोगशीलतेचा अभ्यास करून संस्थानामध्ये विविध शेतीविषयक सुधारणा करून शेती क्षेत्राचा कायापालट केला.

3.राजर्षी शाहू महाराज यांनी औद्योगिक सर्वेक्षणातून उद्योग क्षेत्राची आपल्या संस्थानामध्ये सुरुवात केली.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

१.डॉ.जयसिंगराव पवार राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी,कोल्हापूर.

२.प्रा.नानासाहेब साळुंखे शाहूंच्या आठवणी वृषाली प्रकाशन,कोल्हापूर.

३.प्रा.अजित पाटील लोकराजा शाहू छत्रपती डायमंड पब्लिकेशन्स.

४.डॉ.रमेश जाधव लोकराजा शाहू छत्रपती सुरेश एजन्सी.

५.धनंजय कीर राजर्षी शाहू छत्रपती पॉपुलर प्रकाशन.

६.www.wikipedia.com